# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१९३ दिनांक -२३/०५/२०२४

**गांजा हा अंमली विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगणाऱ्या दोन आरोपीत यांच्याकडुन २४ किलो वजनाचा ५,२८,०००/- रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ जप्त करुन आरोपीत यांना गजाआड करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.**

दिनांक २२/०५/२०२४ रोजी २२:३० वा. च्या सुमारास दोन इसम तुंगार फाटा, वसई पुर्व ता. वसई जि. पालघर येथे गांजा हा अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता येणार असल्याबाबत पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशिर माहिती प्राप्त झाली होती. त्यांनी सदर बातमीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. शकिल शेख, व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पाउपनिरी/ तुकाराम भोपळे, व अंमलदार यांना मिळालेल्या बातमीची सत्यता पडताळुन कायदेशिर कारवाई करणेबाबत आदेश दिले होते.

सदर आदेशान्वये पोलीस निरीक्षक शकिल शेख, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक/सोपान पाटील, पोलीस उप निरीक्षक तुकाराम भोपळे व पोलीस पथक यांनी तुंगारफाटा, ब्रिज जवळ, वसई पुर्व ता. वसई जि. पालघर येथे सापळा रचुन सदर ठिकाणी गांजा या अमंली पदार्थाची बेकायदेशिर रित्या विक्री करण्या करीता आलेले इसम - १) मनोज कुमार रामेश्वर यादव, वय ३० वर्षे, २) मनोज शामदेव साव, वय ३० वर्षे, दोन्ही रा. डोगरी, काशिगाव, काशिमिरा, ता. जि. ठाणे यांना ताब्यात घेऊन त्यांची व त्यांच्याकडे असलेल्या रिक्षाची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांच्या ताब्यात असलेल्या रिक्षामध्ये असलेल्या दोन फायबरच्या सुटकेस मध्ये २४ किलो वजनाचा ५,२८,०००/- रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला असुन नमुद आरोपीत यांचे विरुध्द दिनांक २३/०५/२०२४ रोजी पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ४८८/२०२४ गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) ii (क), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं.रवि वानखेडे, किरण आव्हाड, मिथुन मोहिते, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, निखील मंडलिक, सुजय पाटील, सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

-------------------